Jagdamba Education Society's

# Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
**At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401**

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 24/07/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाचनाचा, आतल्या वाचनाचा... आपलं महानगर My महानगर.com www.mymahanagar.com

# दिनविशेष



## अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते मनोज कुमार

मनोज कुमार हे एक हिंदी चित्रपटसृष्टीतले अभिनेते, पटकथालेखक, दिग्दर्शक आणि निर्माते होते. त्यांना भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वात यशस्वी अभिनेत्यांपैकी एक मानले जाते. देशभक्तीपर चित्रपटांचा ट्रेंड सुरू करण्यासाठी ओळखले जाणारे, त्यांना भरत कुमार हे टोपणनाव देण्यात आले. त्यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी ब्रिटिश भारतातील अबोटाबाद (आता खैबर पख्तूनख्वा, पाकिस्तान) येथे झाला. त्यांनी हिंदू कॉलेजमधून पदवी पूर्ण केली आणि नोकरी शोधू लागले.

सुरुवातीला त्यांना १९५७ च्या 'फॅशन' चित्रपटात एक छोटीशी भूमिका मिळाली. त्यात त्यांनी अभिनयाची छाप सोडली. त्यानंतर 'कांच की गुडिया' (१९६०) या चित्रपटात त्यांना मुख्य भूमिका देण्यात आली. शोर, क्रांती, क्लर्क, रोटी, कपडा और मकान, जय हिंद, उपकार या चित्रपटांमध्ये त्यांनी दिग्दर्शकाची आणि संकलकाची भूमिकाही पार पाडली. शोर या सिनेमातील 'इक प्यार का नगमा है' हे गाणं आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. मेरे देश की धरती सोना उगले, उगले हिरे, मोती हे देशभक्तीपर गाणे तर प्रेक्षकांच्या पहिल्या पसंतीचे ठरले आहे. उपकार, पूरब-पश्चिम, क्रांती, रोटी, कपडा और मकान हे त्यांचे यशस्वी चित्रपट होते. मनोज कुमार यांना ७ फिल्मफेअर पुरस्कार मिळाले. 'उपकार' ला सर्वोत्कृष्ट चित्रपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट कथा आणि सर्वोत्कृष्ट संवाद असे चार फिल्मफेअर पुरस्कार मिळाले. १९९२ मध्ये त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०१६ मध्ये त्यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. मनोज कुमार यांचे ४ एप्रिल २०२५ रोजी मुंबईत निधन झाले.

Nashik Edition

Jul 24, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's SND POLYTECHNIC KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401